श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन तात्पुरते दुर करणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक- साप्रवि-२/ग्रापं-३/2427008/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १.पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र. लाप्रवि/अहिल्यानगर युनिट/७९६/२०२६, दिनांक- २३/०४/२०२६.
२.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीडीआर १०९९/प्र.क्र.६२/९९/११अ, मुंबई दिनांक ०३ एप्रिल,२०००

संदर्भ क्र.१ अन्वये पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांनी संदर्भीय पत्रानुसार, श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-कर्जुने खारे,ता.जि. अहिल्यानगर यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाखाली दिनांक- २०/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल केलेबाबत कळविले आहे.

सदरचे पत्रात तक्रारदार यांचे वडील यांनी सन २०२३ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजनेसाठी ग्रामपंचायत खारेकर्जुने येथे नाव नोंदवले होते. सन २०२४ मध्ये ऑनलाईन यादीत नाव आल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया खात्यात १५०००/- रू. अनुदान जमा झाले. त्यानंतर प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २ मंजुरीसाठी ग्रामसेविका पुष्पा डेरे यांनी १००००/- रू. लाचेची मागणी केली. तसेच गौतम सूर्यवंशी यांनी घरकुलाच्या तपासणीसाठी आले असता घरकुलाचा निधी मिळवून देण्यासाठी १००००/- रू. मागणी केली. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. कार्यालयात तक्रार दिली.

तक्रारीचे अनुषंगाने लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान ग्रामपंचायत कार्यालय, कर्जुने खारे, ता. नगर येथे तक्रारदार यांचेकडे आलोसे यांनी प्रधानमंत्री आवास योजना टप्पा-२ मंजुरीसाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आलोसे यांनी प्रत्येकी ५०००/- रुपयांच्या लाचेची मागणी केलेली असल्याचे निष्पन्न झाले.

सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार हे आलोसे क्रमांक १ पुष्पा डेरे यांचेकडे लाच रक्कम देण्यासाठी गेले असता त्यांनी आलोसे सूर्यवंशी यांच्याकडे रक्कम देण्यास सांगितली. निमगाव घाना रोड, कर्जुने खारे, ता. नगर येथे आलोसे सूर्यवंशी यांनी तक्रारदार यांचे कडुन १०,०००/- रुपये लाच रक्कम स्वीकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेविका श्रीमती पुष्पावती डेरे, यांना एम.आय.डि.सी., पो.स्टे., गु.रं.नं.२६२/ २०२६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दि.२०/०४/२०२६ रोजी १६.५५ वा ताब्यात घेवुन बीएनएसएस ४३ (५) प्रमाणे नोटीस देवुन त्यांना दि.२१/०४/२०२६ रोजी १२/३० वा. अटक नोंद घेण्यात आली आहे. त्यांना दि.२१/०४/२०२६ रोजी मा.विशेष न्यायालय, अहिल्यानगर यांनी जामीनावर मुक्तता केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील नियम ३- पदावरुन तात्पूरते दुर करणे- पोट नियम (१) (ब)- कोणत्याही फौजदारी गुन्ह्याच्या संबंधीतील त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाचा बारीक तपास किंवा न्याय चौकशी करण्यात येत असेल त्याबाबतीत नियुक्ती प्राधिकरण कर्मचा-यास पदावरुन निलंबित करु शकेल.

उक्त नमुद केलेनुसार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांनी कार्यवाही करुन दिनांक- २०/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल केल्यामुळे मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चा नियम ३ चे १(ब) व संदर्भ क्र.२ च्या शासन

निर्णयामधील मुद्दा क्रमांक ०७ (ब) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी, यांना दिनांक- २०/०४/२०२६ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबीत करीत आहे.

पुढे असाही आदेश देत आहे की, निलंबन काळात श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी, यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ (१) नुसार मुळ वेतनाच्या ५० टक्के व त्यावर आधारीत महागाई भत्ता व इतर मिळणारे भत्ते जिल्हा परिषदेच्या सेवेतून सेवा निलंबित केल्यापासून मिळणेस पात्र राहील.

त्याप्रमाणे, निलंबनाचे कालावधीत, श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी, यांना खाजगी नोकरी, खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही. जर त्यांनी सेवा निलंबन काळात नोकरी, धंदा व इतर व्यवसाय केल्यास ती गैरवर्तणूक होऊन व त्या कारणासाठी ते शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी, हे निर्वाह भत्ता मिळण्याचा हक्कही गमावतील. जो पर्यंत निलंबनाचा आदेश अस्तित्वात आहे. तो पर्यंत श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी, मुख्यालय पंचायत समिती --राहुरी-------------- येथे राहील. श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी, यांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती ---राहुरी--------------- यांचे पुर्व मंजूरी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही अथवा त्यांना गैरहजर राहता येणार नाही. जर गैरहजर राहीले तर ती कृती गैरवर्तणूक ठरेल आणि श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी, हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील.

गटविकास अधिकारी,पंचायत समिती --राहुरी------------ यांनी श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, ग्रामपंचायत अधिकारी, यांना निर्वाह भत्ता देण्यापुर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६९ (१) अनुसार प्रत्येक महिन्यास प्रमाणपत्र घ्यावे.

या आदेशाची नोंद श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी, यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०६०८०६००८२ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 08-06-2026 18:57:20
(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत कर्जुने खारे,ता.जि.अहिल्यानगर
व्दारा व प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर
प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर

२/-सदर आदेश संबंधितांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विना विलंब सादर करावी.

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती --राहुरी----------जि.अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.
प्रत :- ग्रामपंचायत, आस्थापना कार्यासन- ग्रापं-१, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी